गुरुवार, दिनांक १६ मे २०२४

अधिसूचना

क्रमांक : ४६/२०२४ दिनांक : १६-०५-२०२४

विषय : नवीन महाविद्यालयाचे प्रथम संलग्नीकरणाबाबत..

सर्व संबंधीतांचे माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने खाली दर्शविलेले नवीन महाविद्यालये सत्र २०२३-२४ पासुन सुरु करण्यास शासन आदेशात नमुद केलेल्या अटींच्या अधिन राहून कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेली आहे.त्याअनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समित्यांचे अहवाल विद्या परिषदेच्या पक्षात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा,२०१६ मधील कलम १२(७) अंतर्गत स्विकृत केल्यानुसार स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या संस्थेच्या स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या नवीन महाविद्यालयास स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या अभ्यासक्रमाकरिता स्तंभ क्र.६ मध्ये दर्शविलेल्या कालावधीकरीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ मधील कलम १०८ व ११० मध्ये दर्शविलेल्या तरतुदींचे अधिन राहुन तसेच **Bar Council of India** चे मान्यतेच्या अधिन राहून **प्रथम संलग्निकरण** प्रदान करण्यात येत आहे.

महाविद्यालयात उपरोक्त अभ्यासक्रमास प्रवेश देतांना शासनाने व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नियमांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक आहे. मान्य प्रवेशक्षमतेपेक्षा अतिरीक्त विद्यार्थांना प्रवेश देण्यात येऊ नये.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नियम, विनियम, अध्यादेश, परिनियम, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६ मधील तरतुदी महाविद्यालयास बंधनकारक राहतील.

नियमानुसार शिक्षकांची तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे भरणे संस्थेला बंधनकारक आहे.

शासन निर्णय क्र. युजीसी २००३/(३३/०३)/१ विशी-४, दिनांक ०६ एप्रील, २००३ प्रमाणे संस्थेच्या शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे नियमन करणे व शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून सर्व अभ्यासक्रमांच्या शुल्काचे प्रमाणिकरण करुन घेणे संस्थेस / महाविद्यालयास बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्यापूर्वी शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे प्रमाणिकरण शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून मान्य करुन घ्यावे व त्यानुसारच शुल्काची आकारणी करावी.

तसेच,शासन निर्णयातील अटी व शर्तीचे, संस्थेने/महाविद्यालयाने पालन करावे व तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६ मधील कलम १०८ नुसार त्वरीत हमीपत्र सादर करणे संस्थेवर बंधनकारक आहे.

तक्ता

अ.क्र.	संस्थेचे नांव	महाविद्यालयाचे नांव व सांकेतांक क्र.	अभ्यासक्रम/विषय	प्रवेश क्षमता	संलग्नीकरण कालावधी	शासन आदेश क्रमांक व दिनांक
1.	2.	3.	4.	5.	6.	7.
1.	Vasundhara Bahuuddeshiya Samajik Sanstha Adarsha Nagar, Khamgaon, Tq. Khamgaon, Dist. Buldhana.	Siddhivinayak College of Science, Commerce and Arts, Shirasgaon Nile, Khamgaon Road, Tq.Shegaon, Dist:-Buldhana (1016)	B.A. Part I (English, Marathi, History, Political Science, Economics, Marathi Lit., English Lit., Sociology, Home Economics, Philosophy) B.Com. Part I (As per Syllabus) B.Sc. Part I (Marathi, English, Chemistry, Physics, Mathematics, Computer Science, Zoology, Botany, Electronics)	120 120 120	For the session 2024-25	शासन आदेश क्र.मान्यता - २०२३/प्र.क्र.९५/ मशि-४, दि.१५ जुन २०२३

2.	Vasundhara Bahuuddeshiya Samajik Sanstha Adarsha Nagar, Khamgaon, Tq. Khamgaon, Dist. Buldhana.	Swami Vivekanand College of Science, Commerce and Arts, Adarsha Nagar, Tq. Khamgaon, Dist:-Buldhana (1017)	B.Sc. Part I (Marathi, English , Chemistry, Physics, Mathematics, Zoology, Botany, Computer Science, Electronics) B.Com. Part I (As per Syllabus) B.A. Part I (English, Marathi, History, Political Science, Economics, Marathi Lit., English Lit., Sociology, Home Economics, Philosophy)	120 120 120	For the session 2024-25	शासन आदेश क्र.मान्यता - २०२३/प्र.क्र.९५/ मशि-४, दि.१५ जुन २०२३
3.	Rahim Ali Khan Saudagar Multipurpose And Education Society, Chikhli, Tq.Chikhli, Dist. Buldhana.	Karam Vidhi Mahavidyalaya, Old Buldhana Road, Malgani Shivar, Chikhli, Tq. Chikhli, Dist.Buldhana (1018)	L.L.B.5 Years L.L.B.3 Years	60 60	For the session 2023-24 (Subject to permission by Bar Council of India	शासन आदेश क्र.मान्यता - २०२३/प्र.क्र.९५ /मशि-४, दि.१५ जुन २०२३

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ